# जिल्हा निवड / भरती समिती, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, नाशिक

# पाहिजेत

**समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नाशिक**
**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय - कर्मचारी करारतत्वावर भरती.**
**फेर जाहिरात क्रमांक - 02/2018-18/KGBV/दिनांक 22/10/2018**

दि. 21 व 22 फेब्रुवारी 2018 रोजीच्या जाहिरातीअन्वये सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, पेठ या मुलींच्या निवासी शाळेकरीता शिपाई या पदांवर पात्र महिला उमेदवारांची करारतत्वावर नेमणूक करण्यासाठी विहीत शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणा-या महिला उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते मात्र फक्त 3 उमेदवारांचेच अर्ज प्राप्त झाल्याने या फेर जाहिरातीद्वारे पुनश्च विहीत शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणा-या महिला उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1. पदनाम :- शिपाई - पदसंख्या -1. (कस्तुरबा गांधी बालिका विदयालय, पेठ) प्रवर्ग - खुला.**
**पात्रता/अर्हता:- इयत्ता 7 वी पास.**
**मानधन - दरमहा रु. 5000/-**
**नियुक्ती करारतत्वावर 6 महिन्यांसाठी.**

**अर्ज करणा-या उमेदवारांसाठी सूचना :-** उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या विहीत नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. अर्ज A-4 साईजच्या कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखित केलेला असावा. (अर्जाचा विहीत नमुना सोबत दिला आहे.)

1) दि.21 व 22 फेब्रुवारी 2018 रोजी या कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन शिपाई पदासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज या कार्यालयास सादर केलेले होते ते अर्ज या जाहिरातीसाठी ग्राह्य धरले जाणार नाही.अशा उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन पुनश्च अर्ज करणे अनिवार्य आहे.
2) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
3) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दिनांक 25/4/2016 अन्वये अर्जदाराचे वय दिनांक 1 जुलै 2018 या दिनांकास सर्व साधारण प्रवर्गासाठी 38 वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी 43 वर्षापेक्षा जास्त नसावे.अपंग उमेदवारासाठी वयाची अट वय वर्ष 45 असेल.
4) विहीत अर्हता पूर्ण करणा-या पात्र उमेदवारास करारावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात येईल. नियुक्तीच्या वेळेस रुपये 100 च्या मुद्रांकावर करारनामा करुन दयावा लागेल.
5) जाहिरातीत घोषित केलेल्या पदसंख्या, पदांमध्ये, अटी व शर्तीमध्ये तसेच आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो. तो अधिकार जिल्हा निवड समितीने राखून ठेवलेला आहे.
6) उमेदवाराने आवेदनपत्रासोबत प्रमाणपत्रांच्या आवश्यक त्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.
7) सदरचे पद कंत्राटी स्वरुपाचे असल्याने निवड झालेल्या उमेदवारांचा भविष्यात सदर पदावर किंवा जिल्हा परीषद नासिक अंतर्गत इतर कोणत्याही पदांवर कोणताही कायदेशीर हक्क राहणार नाही. याबाबत निवड झालेल्या उमेदवारांना करारनामा करुन द्यावा लागेल.
8) सदरचे पद शैक्षणिक अर्हतेच्या आधारे गुणवत्तेनुसार भरण्यांत येतील.
9) उमेदवारांनी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय तालुका,पेठ,शिपाई या पदाकरीता अर्ज असा स्पष्ट उल्लेख करुन मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नाशिक सर्व शिक्षा अभियान कक्ष यांचे नावे रजिस्टर पोष्टाने पाठवावेत किंवा समक्ष अर्ज दाखल करुन पोहोच घ्यावी. दिलेल्या अंतीम तारखेच्या आत अर्ज पोहचतील याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपाल सेवेच्या दिरंगाईस / विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

10) उमेदवारांना त्यांच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी रद्द ठरविली जाईल.
11) अर्ज केला किंवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
12) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
13) मुलाखती संदर्भात स्थळ व दिनांक/वेळेबाबत सर्व शिक्षा अभियानाच्या सुचना फलकावर माहिती उपलब्ध होईल. याबाबत उमेदवारांनी स्वत: खात्री करुन घ्यावी.
14) **पदभरतीबाबत निवड / भरती समितीचा निर्णय अंतिम व उमेदवारास बंधनकारक राहील.**

- **वेळापत्रक**

| अ | तपशिल | कालावधी | स्थळ |
|---|---|---|---|
| 1 | अर्ज स्विकृती | दिनांक 12 /11 /2018 ते दिनांक 26 /11 /2018 | सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नाशिक येथे सार्वजनिक सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत अर्ज स्विकारले जातील. |
| 2 | पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | दिनांक 4 /12 /2018 | सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नाशिक सुचना फलकावर पहावे. टपालाव्दारे कळविण्यांत येणार नाही याची नोंद घेण्यांत यावी. |
| 3 | अपात्र उमेदवारांच्या हरकती स्विकारणे. | दिनांक 5/12 /2018 ते दिनांक 14 /12 /2018 | |
| 3 | पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. | दिनांक 21 /12 /2018 | |
| 4 | गुणानुक्रमे मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | दिनांक 28/ 12 /2018 | |
| 5 | गुणवत्ता पात्र उमेदवारांना गुणानुक्रमे मुलाखतीस बोलविणे. | दिनांक / /2018 | दिनांक निश्चितीबाबत सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद नाशिक सुचना फलकावर सूचना लावण्यात येईल. टपालाव्दारे अथवा दुरध्वनीव्दारे कळविण्यांत येणार नाही याची नोंद घेण्यांत यावी. |
| 6 | निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे. | दिनांक / /2018 | |

- **वरील वेळापत्रकात नमुद केलेल्या दिनांकामध्ये प्रशासकीय कारणास्तव बदल होवू शकतो याची नोंद घ्यावी.**

**सही/-** **सही/-** **सही/-**

**(डॉ. वैशाली झनकर)**
**सदस्य सचिव निवड समिती तथा**
**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद नाशिक**

**(डॉ.नरेश गीते )**
**सहअध्यक्ष निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**(बी. राधाकृष्णन.)**
**अध्यक्ष, निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी नाशिक**

# अर्जाचा नमुना

| |
|---|
| अर्जदाराचा<br>पासपोर्ट<br>साईजचा फोटो<br>स्वत:च्या<br>स्वाक्षरीसह |

**प्रति,**
**मा. अध्यक्ष,**
**जिल्हा निवड /भरती समिती, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, नाशिक**
**तथा मा. जिल्हाधिकारी, नाशिक.**

**विषय:- कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,पेठ,जि.नासिक,येथिल शिपाई पदासाठी अर्ज.**

**महोदय,**

जिल्हा परिषद नाशिक समग्र शिक्षा अभियानांतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय पेठ,जि.नासिक या निवासी स्वरुपाच्या विद्यालयामध्ये मी शिपाई पदासाठी अर्ज करीत आहे. अर्जासोबत साक्षांकित केलेल्या आवश्यक कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती जोडलेल्या आहेत.

1. **पदाचे नाव ..शिपाई** ......................................................
2. **अर्जदाराचे संपूर्ण नाव** ....................................................................................
   **(आडनांव) (स्वत:चे नाव) (वडिलांचे/पतीचे नाव)**
3. **पत्रव्यवहाराचा पत्ता :-** ..................................................................................
   पिन कोड नं. ...............दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक ..................
4. **जन्मतारीख :-** अंकी ................................ अक्षरी ..............................................
   अर्जदाराचे 01/10/2018 रोजीचे वय- वर्षे महिने दिवस
5. **अर्जदाराने आपल्या जात संवर्गाच्या रकान्यात ( √ ) खुण करावी.**

| अ.जाती | अ.जमाती | वि.जा./भ.ज. | | | | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | | | |
| | | | | | | | | |

6. **अर्जदाराने नोकरीसंदर्भात सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण/एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग इ. कार्यालयांपैकी कोठे नोंदणी केलेली आहे काय?**

| कार्यालयाचे नाव | नोंदणी क्रमांक | दिनांक |
|---|---|---|
| | | |

7. **अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परीक्षांच्या तपशील)**

| परीक्षा | मंडळ/ विद्यापीठ | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकुण गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

8. **अर्जदाराची व्यावसायिक पात्रता**

| परीक्षा | मंडळ/ विद्यापीठ | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकुण गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.अनुभवाचा तपशील**

| पदनाम | पासून | पर्यंत | वेतनश्रेणी | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरीलप्रमाणे नमूद केलेला तपशिल सत्य व बरोबर आहे. मी असे प्रमाणित करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच उपरोक्त पद हे करारपध्दतीने तात्पुरत्या कालावधीसाठी एकत्रित दरमहा पारिश्रमिकावर भरावयाचे असल्याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

**स्थळ:-**
**दिनांक / /** **अर्जदाराची स्वाक्षरी**